परभणी जिल्हयातील देहविक्री करणाऱ्या महिलांच्या अपत्यांचे शैक्षणिक व सामाजिक समस्यांचे अध्ययन

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

आंतरविद्याशाखेच्या समाजकार्य विषयात पीएच.डी. पदवीसाठी सादर करावयाचा

संशोधन पूर्व आराखडा

* **संशोधक** *

किशन गणपती गायकवाड

एम.एस.डब्ल्यू., सेट (समाजकार्य)

* **मार्गदर्शक** *

प्रा.डॉ. दिनेश शिवाजी मौने

विभाग प्रमुख

महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, समाजकार्य विभाग लातूर

* **संशोधन केंद्र** *

सामाजिक शास्त्रे संकुल

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

जुलै - २०२१

प्रस्तावना (Introduction)

आधुनिक मानव समाज हा अधिक गुंतागुंतीचा बनत आहे. त्यात वैयक्तिक, कौटुंबिक व सामाजिक प्रश्न निर्माण होत आहेत. समाजाच्या विविध घटकांमध्ये संघर्षाचे व विविध सामाजिक समस्यांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढतच आहेत. समाजातील विविध प्रश्न व समस्यांचा विघातक परिणाम समाजावर होत आहे. समाजाची परिवर्तनीय सामाजिक परिस्थिती, प्रश्न, समस्या, त्याचे सामाजिक, आर्थिक परिणाम इत्यादी संबंधित सामाजिक शास्त्रांमध्ये संशोधन करणे आवश्यक बनले आहे. कारण सामाजिक जीवनात घडणाऱ्या घटना अतिशय जटिल व गुंतागुंतीच्या असल्या तरी सामाजिक शास्त्रज्ञांनी मानवी वर्तन व मानवी संस्थांची वस्तूस्थिती मांडण्यास सुरुवात केली आहे. त्यामुळे बदलत्या सामाजिक परिस्थितीचा व्यक्तीच्या वर्तनावर, मनोवृत्तीवर, कौशल्यावर व एकूणच सामाजिक परीस्थितीवर कशा प्रकारचा परिणाम होतो. याचे ज्ञान संशोधनातून मिळत आहे.

देहविक्रीची ही समस्या समाजात प्राचीन काळापासून चालत आलेली आहे. फक्त तिचे स्वरूप वेगवेगळ्या ठिकाणी वेगवेगळे एवढेच. तीचे पूर्णतः उच्चाटन करणे शक्य झालेले दिसत नाही. म्हणून त्याला समस्या म्हणावे की समस्येचे उत्तर, याचेही उत्तर आज शोधणे विविध समाजशास्त्रीय विचारवंताना कठीणच आहे. भारतीय समाजामध्ये स्त्री-पुरुषांमधील लैंगिक संबंधावर कांही बंधने घालण्यात आलेली आहेत. पती-पत्नीमधील लैंगिक संबंध समाजाला मान्य असतात. परंतु देहविक्रीची किंवा वेश्याव्यवसायाचे लैंगिक संबंध समाजाला मान्य नसतात. याच स्त्री-पुरुषांमधील लैंगिक संबंधाच्या विचलनात्मक वर्तनातून देहविक्रीची समस्या निर्माण होते.

देहविक्रीचा प्रश्न हा स्त्रियांना समाजात असलेले दुय्यम स्थान, त्याच्या श्रमाऐवजी त्यांच्या शरीराला मोबदला देण्याची विकृत मनोवृत्ती, स्त्री शरीराभोवती घुटमळणारी समाजाची फसवी नैतिकता या सर्व घटकांबरोबर समाजाची आर्थिक घडी बदल्यामुळे होणाऱ्या उलथापालथी, आर्थिक हितसंबंध, आर्थिक विषमतेतून निर्माण होणारी अन्यायकारक जीवनपद्धती ह्या विविध कारणामुळे निर्माण झाला आहे. त्याचबरोबर भारतीय समाजात या सर्वांच्या जोडीला विषमताधिष्टीत, श्रेष्ठ-कनिष्ठत्वाच्या फोल कल्पनांवर आधारलेली जाचक जातीव्यवस्थाही कार्यरत आहे. या सर्व पार्श्वभूमीवर तळागळातील आर्थिक विषमतेमुळे महिलांचे प्रमाण देहविक्रयाचा व्यापारात वाढताना दिसत आहे. हा प्रश्न स्त्रियांच्या लैंगिक शोषणाच्या परिसीमेचा तर आहेच परंतु समाजातील सर्व प्रकारची विषमता, संपत्ती व अधिकारांची असमान वाटणी यातून महिलांची खरेदी-विक्री होते. ही बाब नाकारता येत नाही. देहविक्रयच्या बाजारात खरेदल्या किंवा विकल्या जाणाऱ्या व्यक्तींना अत्याचार, हिंसा, अपमान, उपेक्षा, शाश्वतीचा अभाव, कलंकित जीवन अशा सर्व आपत्तींचा सामना करावा लागतो. या कलंक आणि भेदभावामुळे तीव्र स्वरूपाच्या शारीरिक आणि मानसिक हिंसाचाराचा सामना या समुदायास करावा लागतो. नैराश्य, असाध्य आजार, लैंगिक संसर्गाचे आजार, गुप्तरोग आणि एच.आय.व्ही. / एड्स ची लागण यासारखी असाध्य कमजोर करणारे रोग यातून मृत्यू ओढवतात. हिंसाचार, मानवी हक्कांचे उल्लंघन तसेच बाह्य जगतातील गुन्हेगारांची असुरक्षितता यामुळे या महिलांना वर नमूद केलेल्या असाध्य रोगाचा धोका अधिक वाढतो. हा परस्परसंबंध अनेक संशोधनातून सिद्ध झालेला आहे.

देहविक्री हा व्यवसाय व्यवसायाबरोबर सामाजिक असल्याचाही भास होतो, कारण हा व्यवसाय किंवा सेवा करणाऱ्या महिलांना समाज हा अत्यंत हीन भावनेने बघतो, जर ह्या

महिलांविषयी आज समाजाचा भाव असा असेल तर त्यांच्या पासून होणाऱ्या अपत्यांना कुठल्या मानसिक, सामाजिक व शैक्षणिक समस्यांना तोंड द्यावे लागत असेल हे कल्पनेच्या सुद्धा बाहेर आहे.

अशा या सर्व बाबींचा विचार केला असता जबरदस्तीने व्यवसाय करणाऱ्या विशेषतः अल्पवयीन मुली यांना त्यांचे नातेवाईकच विकतात नोकरी किंवा लग्नाचे आमिष दाखवून त्या फसविल्या जातात. त्याचप्रमाणे देहविक्रीच्या बाजारात भारतातील अन्य राज्यांप्रमाणेच महाराष्ट्रातील गरीब व अविकसित भाग देवदासी व तत्सम प्रथांचा प्रभाव असलेले जिल्हे येथून वाहतूक होणाऱ्या मुलींचे प्रमाण मोठे आहे. मुलींचे अवैध वाहतूक थांबविणे आणि त्यांच्या शैक्षणिक व सामाजिक हक्कांचे संरक्षण करण्यासाठी शासन उपाययोजना करणे आवश्यक आहे. त्यामुळे संशोधनकर्त्याने अशा परभणी जिल्ह्यातील देहविक्री करणाऱ्या महिलांच्या येणाऱ्या पिढीचा अर्थातच अपत्यांचे शैक्षणिक व सामाजिक समस्यांचे अध्ययन करणार आहे.

समस्यासुत्रण (Problem Formulation)

परभणी जिल्हा महाराष्ट्र राज्यातील मराठवाडा विभागात येतो. मराठवाड्यातील इतर भागांप्रमाणेच हा जिल्हा प्रथम निजामाच्या अधिपत्याखाली होता. परभणी जिल्ह्याचे क्षेत्रफळ ६२५०.५८ चौ.कि.मी असून जिल्ह्याची लोकसंख्या १८,३५,९८२ (२०११ च्या जनगणनेनुसार) आहे. सदर जिल्ह्यात विविध जाती-धर्माचे लोक वास्तव्यास राहतात. एकूण ०९ तालुक्यांचा हा जिल्हा. आजही या जिल्ह्यातील काही तालुक्यांच्या ठिकाणी देहविक्री मोठ्या प्रमाणात चालतो. परंतु हा व्यवसाय करणाऱ्या महिलांच्या अपत्यांचा सामाजिक व शैक्षणिक विकास झालेला नाही. कारण या अपत्यांना तेथील सामाजिक, आर्थिक आणि मानसिक परिस्थितीतून बाहेर पडण्यास वाव मिळत नाही. त्यामुळे परभणी जिल्ह्यातील देहविक्री करणाऱ्या महिलांच्या अपत्यांना विविध शैक्षणिक व सामाजिक समस्यांना सामोरे जावे लागते.

म्हणून या अपत्यांचे शिक्षणाचे प्रमाण अत्यंत अल्प प्रमाणात दिसून येते आणि समाजात सामान्य मुलांप्रमाणे वागणूक मिळत नाही. त्यामुळे ही अपत्य विविध समस्या निर्माण करताना दिसून येतात. ज्यात प्रामुख्याने गुन्हेगारी, व्यसनाधीनता, बेरोजगारी अशा विविध समस्या निर्माण होतात. म्हणून संशोधकाने परभणी जिल्ह्यातील देहविक्री करणाऱ्या महिलांच्या अपत्यांचे शैक्षणिक व सामाजिक समस्यांचे अध्ययन या संशोधनातून करणार आहे.

संशोधन विषयाची गरज (Need of Study)

परभणी जिल्ह्यातील देहविक्री करणाऱ्या महिलांच्या अपत्यांचे शैक्षणिक व सामाजिक समस्यांचे अध्ययन हा विषय निवडण्याची गरज म्हणजे आजही भारतीय समाजात या अपत्यांना आपल्या आई प्रमाणेच विविध मानसिक, सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक समस्यांना सामोरे जावे लागते. त्यामुळे यांचा सामाजिक व शैक्षणिक विकास होणे शक्य होत नाही. म्हणून

संशोधकाने या संदर्भात येणाऱ्या शैक्षणिक व सामाजिक समस्यांचे अध्ययन करण्याची गरज लक्षात घेऊन हा विषय निवडलेला आहे.

संशोधन विषयाचे महत्व (Significance of Study)

सदरचा अभ्यास परभणी जिल्हयात केला जाणार असून साधारणपणे यात देहविक्री करणारे ५०० ते ५५० कुटुंबे असून त्यात १००० ते १२०० अपत्यांचा समावेश आहे. म्हणून परभणी जिल्हयातील देहविक्री करणाऱ्या महिलांच्या अपत्यांचे शैक्षणिक व सामाजिक समस्यांचे अध्ययन या प्रबंधाच्या माध्यमातून होणार आहे. यामुळे निश्चितच याचा फायदा समाजकल्याण विभाग आणि शासनाची विविध ध्येयधोरणे ठरवण्यासाठी होऊ शकतो. तसेच विविध सामाजिक कार्यकर्ते, राजकारणी, विद्यार्थी, अभ्यासक आणि सामाजिक संस्था याचबरोबर देहविक्री करणाऱ्या महिलांच्या अपत्यांना समाजात सन्मानाने जगण्यासाठी यावरील उपायांचा फायदा होणार आहे.

समाजकार्य संशोधन पद्धती (Social Work Research Methodology)

समाजकार्य संशोधन आणि सामाजिक संशोधन यामध्ये फार फरक आहे असे नाही. दोन्ही संशोधनाव्दारे नवीन ज्ञानाची निर्मिती करण्यासाठी वापर होतो. पण दोन्ही संशोधनाच्या कार्यपध्दती मध्ये आणि उद्देशामध्ये फरक आहे. समाजकार्य संशोधन हे केवळ समाजकार्य विद्याशाखेसाठी आहे. याचा वापर फक्त समाजकार्य या विषयाशी संबंधीत शिक्षण सेवाभावी संस्था यांच्या मध्ये होतो. समाजकार्य संशोधनाचा समाजकार्य विषयातील नवीन सिध्दांत निर्मिती, समाजकार्य करत असतांना वापरण्यात येणाऱ्या हस्तक्षेपाच्या नवनवीन पध्दती शोधण्यासाठी होतो. समाजकार्य संशोधन हे केवळ समाजकार्याच्या ज्ञानाशी म्हणजेच समाजकार्यात वापरण्यात येणाऱ्या पध्दती, तंत्रे, कौशल्य, समाजकार्याचे सिध्दांत यांच्याशीच संबंधीत आहे. प्लेचर हे शास्त्रज्ञ समाजकार्य संशोधनाची संकल्पना विषद करतांना असे म्हणतात की, समाजकार्य संशोधन म्हणजे समाजकार्याची कार्ये आणि पध्दतीच्या वैधतेची चाचणी घेण्याची वैज्ञानिक पध्दती होय.

संशोधक परभणी जिल्हयातील देहविक्री करणाऱ्या महिलांच्या अपत्यांचे शैक्षणिक व सामाजिक समस्यांचे अध्ययन करीत असताना समाजकार्य संशोधन पद्धतीचा अवलंब करणार आहे. यात देहविक्री करणाऱ्या महिलांच्या अपत्यांचे शैक्षणिक व सामाजिक समस्यांचे अध्ययन करून त्यांच्या पुनर्वसनासाठी उपाय व योजना सुचवणार आहेत.

संशोधन विषयाची व्याप्ती (Scope of Study)

१) भौगोलिक व्याप्ती :-

सदर संशोधनात भौगोलिक क्षेत्र परभणी जिल्हा असून यात एकूण ०९ तालुके आहेत. यामध्ये परभणी, गंगाखेड, मानवत आणि सेलू शहरांत सर्वाधिक संख्या देहविक्री करणाऱ्या महिलांची आढळून येते.

२) अभ्यासाची सामाजिक व्याप्ती :-

सदर संशोधनात देहविक्री करणाऱ्या महिलांच्या अपत्यांचाच समावेश असणार आहे. संशोधक या महिलांच्या अपत्यांच्या शैक्षणिक व सामाजिक समस्यांचे अध्ययन करणार आहे.

संशोधनाचे उद्‌देश (Objective of Study)

१) परभणी जिल्ह्यातील देहविक्री करणाऱ्या महिलांच्या अपत्यांचे सामाजिक समस्यांचा त्यांच्या शिक्षणावर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास करणे.

२) परभणी जिल्ह्यातील देहविक्री करणाऱ्या महिलांच्या अपत्यांचे आरोग्यविषयक समस्यांचा त्यांच्या शिक्षणावर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास करणे.

३) परभणी जिल्ह्यातील देहविक्री करणाऱ्या महिलांच्या अपत्यांचे शिक्षणातील गळतीच्या कारणांचा अभ्यास करणे.

४) परभणी जिल्ह्यातील देहविक्री करणाऱ्या महिलांच्या अपत्यांचे शैक्षणिक व सामाजिक समस्यांचा व त्यावरील उपाय यांच्या परिणामांचा अभ्यास करणे.

५) परभणी जिल्ह्यातील देहविक्री करणाऱ्या महिलांच्या अपत्यांना शासकीय व खाजगी संस्थांकडून मिळणाऱ्या सोई सुविधांमुळे होणारे शैक्षणिक पुनर्वसन याचा अभ्यास करणे.

संशोधनाचे गृहीतकृत्ये (Hypothesis of Study)

१) परभणी जिल्ह्यातील देहविक्री करणाऱ्या महिलांच्या अपत्यांच्या शैक्षणिक समस्या ह्या सामाजिक समस्येमुळे असू शकतात.

२) परभणी जिल्ह्यातील देहविक्री करणाऱ्या महिलांच्या अपत्यांच्या शैक्षणिक समस्या ह्या आरोग्यविषयक समस्येमुळे असू शकतात.

३) परभणी जिल्ह्यातील देहविक्री करणाऱ्या महिलांच्या अपत्यांचे शिक्षणातील गळतीचे विविध कारणे असू शकतात.

४) परभणी जिल्ह्यातील देहविक्री करणाऱ्या महिलांच्या अपत्यांच्या शैक्षणिक व सामाजिक समस्यावरील उपायांमध्ये त्रुटी असू शकतात.

५) परभणी जिल्ह्यातील देहविक्री करणाऱ्या महिलांच्या अपत्यांना शासकीय व खाजगी संस्थांकडून मिळणाऱ्या सोई सुविधांमुळे त्यांचे शैक्षणिक पुनर्वसन होऊ शकते.

संशोधन आराखडा (Research Design)

प्रस्तुत समाजकार्य संशोधनात संशोधक वर्णनात्मक संशोधन आराखड्याचा वापर करणार आहे. संशोधनामध्ये परभणी जिल्ह्यातील देहविक्री करणाऱ्या महिलांच्या अपत्यांचे शैक्षणिक व सामाजिक समस्यांचे वर्णनात्मक विवेचन करण्यात येणार आहे.

तथ्य संकलनाची साधने (Sources of Data Collections)

प्रस्तुत समाजकार्य संशोधनात तथ्य संकलनाची साधने म्हणून संशोधनकर्ता प्राथमिक तथ्य संकलन साधने व द्वितीय तथ्य संकलन साधने यांचा वापर करणार आहे.

१) प्राथमिक तथ्य संकलन (Primary Data Collection)

प्रस्तुत समाजकार्य संशोधन विषयाच्या संशोधनासाठी प्राथमिक साधन सामग्री वापरण्यात येणार आहे. त्यामध्ये प्रश्नावली, मुलाखत, अनुसूची व प्रत्यक्ष निरीक्षण इत्यादी साधनांचा उपयोग करण्यात येणार आहे.

२) द्वितीय तथ्य संकलन (Secondary Data Collection)

प्रस्तुत समाजकार्य संशोधनात संशोधक हा संशोधन विषयाशी म्हणजे परभणी जिल्ह्यातील देहविक्री करणाऱ्या महिलांच्या अपत्यांचे शैक्षणिक व सामाजिक समस्यांचे अध्ययन करण्यासाठी वेगवेगळे संदर्भ ग्रंथांचा वापर करण्यात येणार आहे. तसेच शासकीय अहवाल, व्यक्तिगत प्रलेख, वृत्तपत्रातील लेख, मासिके, वेगवेगळ्या इंटरनेटच्या वेबसाईट आणि विविध संदर्भीय पुस्तके या दुय्यम तथ्यांचा संदर्भ म्हणून वापर करण्यात येणार आहे.

तथ्यांचे विश्लेषण (Data Analysis)

प्रस्तुत समाजकार्य संशोधनासाठी संकलित केलेल्या माहितीचे सारणीयन करून विश्लेषण करण्यात येईल. माहितीच्या स्पष्टीकरणासाठी आलेख, नकाशा इत्यादी साधनांचा उपयोग करण्यात येईल. संकलित केलेल्या माहितीचे सांख्यिकीय विश्लेषण करण्यात येईल.

नमुना निवड पद्धत (Sampling Method)

प्रस्तुत समाजकार्य संशोधनात नमुना निवडण्यासाठी संशोधक संभाव्यता नमुना निवड पद्धतीतील साधा यादृश्चिक नमूना निवड पद्धतीने ३०० उत्तरदात्याची निवड करणार आहे. या नमुना पद्धतीमध्ये संशोधनकर्ता समग्राचे विविध वयोगटामध्ये विभाजन करणार आहे.

पारिभाषिक शब्दांचे अर्थ (Operational Definitions)

१) देहविक्री महिला

" देहविक्री " याचा अर्थ, आर्थिक प्रयोजनांकरिता केलेले, व्यक्तींचे लैंगिक शोषण किंवा केलेला लैंगिक दुराचार आणि "वेश्या" या शब्दप्रयोगाचा अन्वयार्थ तदनुसार लावण्यात येईल.

- **अनैतिक व्यापार (प्रतिबंध) अधिनियम, १९५६ नुसार कलम २ 'च' नुसार.**

२) अपत्य

सदर संशोधनात संशोधकाने ज्या ठिकाणी अपत्य नावाचा उल्लेख केलेला आहे. त्याचा असा अर्थ आहे की, देहविक्री करणाऱ्या महिलांच्या अपत्यांपैकी ज्याचे वय ०६ ते १८ वर्षे वयोगटातील आहे त्यांना संशोधकाने अपत्य असे म्हटले आहे.

३) समुदाय :-

विशिष्ट भौगोलिक ठिकाणी वस्ती करून राहणारा मानवाचा गट.

४) कायदा / अधिनियम

तयार करण्यात आलेल्या नियमांद्वारे आरोपीला होणारी शिक्षा म्हणजे कायदा होय.

संशोधनाचे चल (Research Variables)

१) स्वतंत्र चल

देहविक्री करणाऱ्या महिला, लिंग, आर्थिक सहाय्य.

२) परावलंबी चल

देहविक्री करणाऱ्या महिलांचे अपत्ये, शैक्षणिक समस्या, सामाजिक समस्या, पुनर्वसन.

संदर्भ साहित्य आढावा (Reviews of Literature)

प्रस्तुत समाजकार्य संशोधनात संशोधक परभणी जिल्ह्यातील समाज कल्याण विभाग, विविध सामाजिक संस्था यांचा अहवाल, विविध संदर्भीय साहित्य, अभ्यास विषयाशी संबंधित वेगवेगळे पुस्तकांचा संदर्भ यांचा वापर संशोधक संदर्भ साहित्य म्हणून घेण्यात येणार आहे.

देहविक्री ही समस्या जगामध्ये पूर्वापार चालत आलेली आहे. आजपर्यंत विविध संशोधक, लेखक यांनी देहविक्री करणाऱ्या महिलांच्या समस्येसंदर्भात अहवाल, लेख, पुस्तके लिहिलेली आहेत. त्यांचा उपयोग संशोधक प्रस्तुत संशोधनाच्या विवेचनासाठी घेणार आहे.

१) भारतीय गणिका - डॉ. सुरेश देशपांडे (१९९४)

भारतीय गणिका या पुस्तकात लेखक डॉ. सुरेश देशपांडे यांनी गनिकांची कला व वास्तव्य यांविषयी माहिती अंतर्भूत केली आहे. तसेच पेशवाईतील विलासी जीवनावरील माहिती ची मांडणी केलेली आहे. त्यामुळे देहविक्री ही समस्या गणिकाच्या माध्यमातून आलेली आणि पेशवाई काळात ती कशी होती. याचे विवेचन प्रस्तुत पुस्तकात लेखकांनी घेतली आहे. तरी प्रस्तुत संशोधनात संशोधक यांच्या साहित्याचा आढावा अध्ययनासाठी घेणार आहे.

२) बळवंत कांबळे (२०००)

बळवंत कांबळे यांच्या भारतातील देवदासी प्रथा, चळवळ आणि पुनर्वसन या पुस्तकात यांनी देवदासींचा पूर्वतिहास, देवदासींचे प्रत्यक्षातील जगणे, त्यामागील धार्मिक, सामाजिक, आर्थिक व राजकीय आयाम विचारात घेऊन तसेच या पारंपारिक प्रथेला अलीकडे लागलेले विकृत वळण, समाज सुधारणेसाठी झालेली आंदोलने, शासकीय पातळीवर झालेले प्रयत्न, उपलब्ध सोयी-सवलती इ. समस्यांच्या अनुषंगाने प्राप्त झालेल्या माहितीच्या पार्श्वभूमीवर झालेली साहित्य निर्मिती विचारात घेतलेली आहे. तसेच देवदासींवरील साहित्य सामाजिक बदलांचा समांतर राहिले आहे

काय याची विचार केलेला आहे. त्यामुळे प्रस्तुत संशोधनात संशोधक या साहित्याचा आढावा घेणार आहे.

३) चित्रा - अण्णा भाऊ साठे

साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या चित्रा या कादंबरीत ही स्वातंत्र्य पूर्व काळात इंग्रज अधिकारी, उमराव घराण्यातील लोकांची शारीरिक भूक भागवण्यासाठी देहविक्री करणाऱ्या महिलांच्या समस्सेचे वर्णन यात आढळते. याचाही उपयोग प्रस्तुत समाजकार्य संशोधनात संशोधक अध्ययनासाठी करणार आहे.

४) Biswanath Joardar (1984)

बिस्वनाथ जोर्डन या लेखकाने त्यांच्या ऐतिहासिक आणि आधुनिक दृष्टीकोनातून देहविक्री या पुस्तकात यांनी देहाविक्रीची समस्सेचे प्राचीन काळातील वर्णन हे आधुनिक काळाच्या दृष्टीकोनात कशापद्धतीने आहे. द्याचे विवेचन त्यांच्या या पुस्तकात आढळून येते. पूर्वी चालत असलेला देहविक्रीचा व्यवसाय हा आधुनिक काळात कसा पुढे येत आहे. याचेही विवेचन यात आढळते. म्हणू प्रस्तुत समाजकार्य संशोधनात संशोधक या संदर्भ साहित्याचा आढावा घेणार आहे.

५) कृष्ण प्रसाद कौल (१९३०)

कृष्ण प्रसाद कौल यांच्या साधू और वेश्या पुस्तकात त्यांनी ऐतिहासिक काळी असलेल्या वेश्यांच्या समस्या आणि धर्म या संबंधित विवेचन या पुस्तकात मांडलेले आहे. त्याचप्रमाणे साधू आणि वेश्येची वर्तवणूक यातून स्पष्ट होताना दिसते आहे. त्यामुळे या साहित्याचा आढावा संशोधक प्रस्तुत संशोधनात घेणार आहे. त्यामुळे हे पुस्तक सदरील संशोधनाचे अध्ययनासाठी उपयुक्त ठरणार आहे.

६) संस्कृत लेखक भर्तुर हरी

भर्तुर हरी यांनी त्यांच्या या ‘नीतिशतक’ या ग्रंथांत देहविक्री कशा स्वरुपाची असावी या बद्दल मांडणी केलेली आहे व राजाने त्यामध्ये त्यांची प्रजा म्हणून काळजी कशी घ्यावी या विषयी मांडणी केलेली आहे. याचाही आढावा संशोधक प्रस्तुत संशोधनाचे अध्ययन करताना घेणार आहे.

७) शूद्रक राजा मृच्छकटीकमं (सहावे शतक)

संकृत नाटक साहित्यातील संस्कृत लोकप्रिय महाराज शूद्रक राजा यांच्या मृच्छकटीकमं या नाटकात गणिका, दासी, वेश्या (वारांगना) यांचे व्यवहार राजाच्या प्रती कसे होते या संदर्भात विवेचन आढळते. याचाही उपयोग प्रस्तुत संशोधनात संशोधक घेणार आहे.

संशोधनाची नैतिकता (Research Ethics)

प्रस्तुत समाजकार्य संशोधनात संशोधक स्वतः उत्तरदात्याकडून मुलाखत अनुसूचीत भरून घेणार आहे. तसेच सहभागी निरीक्षण पद्धतीचा वापर करणार आहे आणि वर्णनात्मक पद्धतीचा वापर करून वास्तविक तथ्य गोळा करणार आहे. त्यामुळे वस्तुनिष्ठ तथ्य गोळा होतील आणि ताण विरहित परिस्थितीत उत्तरदात्याकडून मुलाखत अनुसूचीत भरली जाणार आहे. त्याचप्रमाणे ह्या संशोधनात असणाऱ्या अपत्यांची व त्यांची पालकांच्या माहितीसंदर्भात गुप्ततेचे तत्व पाळले जाणार असल्याने संशोधनात नैतिकता पाळली जाणार आहे.

संशोधनाचे प्रकरणीकरण **(Research Chapterization)**

१) मुखपृष्ठ
२) विद्यापीठ प्रमाणपत्र
३) मार्गदर्शक प्रमाणपत्र
४) घोषणापत्र
५) ऋणनिर्देश

प्रकरण ०१ - संशोधन प्रस्तावना

प्रकरण ०२ - पूर्व साहित्याचा आढावा

प्रकरण ०३ - संशोधन पद्धती

प्रकरण ०४ - सारणी व विश्लेषण

प्रकरण ०५ - निष्कर्ष, सारांश, गृहीतकृत्याची पडताळणी, समाजकार्य प्रारूप व सूचना

परिशिष्ठ

१) संदर्भ सूची
२) संशोधन क्षेत्राचा नकाशा
३) मुलाखत अनुसूची
४) इतर संबधित साहित्य

संदर्भ ग्रंथ सूची :

१) Altekar, A. S. The Position of Women in Hindu Civilization, Delhi, 1978.

२) Jarodar, B. Prostitution in 19th and Early 20th Century Calcutta, Delhi, 1985.

३) Punekar, S. D. Rao, K .A Study of Prostitutes in Bombay, Bombay, 1967.

४) अनैतिक व्यापार (प्रतिबंध) अधिनियम, १९५६

५) कांबळे, बळवंत, भारतातील देवदासी प्रथा-चळवळ आणि पुनर्वसन, पुणे, २०००.

६) देशपांडे, सु. र. भारतीय गणिका, पुणे, १९९४.

७) परूळेकर, आशा, आधुनिक स्त्रीच्या समस्या, पुणे, १९९२.

८) डॉ.बी.एम. कऱ्हाडे, शास्त्रीय संशोधन पद्धती. नागपूर, २०१८.

९) मुलाखत, ”विकल्प फौंडेशन” संस्था संचालिका, सौ. लता साळवी मॅडम यांच्याशी.

१०) www.shodhganga.com

११) www.wikipedia.com

* **संशोधक** *

किशन गणपती गायकवाड

एम.एस.डब्ल्यू., सेट (समाजकार्य)

* **मार्गदर्शक** *

प्रा.डॉ. दिनेश शिवाजी मौने

विभाग प्रमुख

महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, समाजकार्य विभाग लातूर